**महाराष्ट्र शासन**

**महाराष्ट्र कारागृह विभाग**

**नागपूर मध्यवर्ती कारागृह,नागपूर-440020**

**दुरध्वनी क्रमांक-0712-2461413**

**ईमेल :-nagpurcp-mh@gov.in**

**बेवसाईट-www.mahaprison.gov.in**

**दरपत्रक सुचना-कारागृह उद्योग- बेकरी विभाग**

दि. ३०/०४/२०२६

जा.क्र.नामका/कारखाना/ बेकरी विभाग/दरपत्रक निवीदा/ 3719 /2026 दि.30 /04/2026

नागपूर मध्यवर्ती कारागृह येथील कारखाना उद्योगातील बेकरी विभागाकरीता सन 2026-27 या वित्तीय वर्षाकरीता आवश्यक खालीलप्रमाणे कच्चामाल खरेदीसाठी दरपत्रके मागविण्यात येत आहे.

| अ.क्र | वस्तुचे नांव | विनिर्देश (Specification) | परिमाण |
|---|---|---|---|
| 1 | वनस्पती तुप (डालडा) | उत्तम प्रतीचा | 500 किलो |
| 2 | गोडे तेल | उत्तम प्रतीचा | 250 किलो |
| 3 | बेकर्स फ्रेश ईस्ट | उत्तम प्रतीचा | 250 किलो |
| 4 | मिठ | उत्तम प्रतीचा | 250 किलो |
| 5 | दही | उत्तम प्रतीचा | 200 किलो |
| 6 | प्लास्टिक पन्नी | उत्तम प्रतीचा | 150 किलो |
| 7 | खोबरा किस | उत्तम प्रतीचा | 150 किलो |
| 8 | दुध पावडर | उत्तम प्रतीचा | 50 किलो |
| 9 | टुटी फ्रुटी | उत्तम प्रतीचा | 100 किलो |
| 10 | कॅल्शीअम पावडर | उत्तम प्रतीचा | 20 किलो |
| 11 | ग्लूटन पावडर | उत्तम प्रतीचा | 20 किलो |
| 12 | ब्रेड इंम्प्रुवर | उत्तम प्रतीचा | 20 किलो |
| 13 | बेकींग पावडर | उत्तम प्रतीचा | 50 किलो |
| 14 | बेकींग सोडा | उत्तम प्रतीचा | 50 किलो |
| 15 | वेनिला इसेंस | उत्तम प्रतीचा | 10 ली. |
| 16 | पाइनॲपल इसेंस | उत्तम प्रतीचा | 5 ली. |
| 17 | पाइनॲपल क्रश | उत्तम प्रतीचा | 10 ली. |
| 18 | कस्टर्ड पावडर | उत्तम प्रतीचा | 50 किलो |
| 19 | सफेद तिळ | उत्तम प्रतीचा | 15 किलो |
| 20 | जिरा | उत्तम प्रतीचा | 15 किलो |
| 21 | नाचणीचे पिठ | उत्तम प्रतीचा | 25 किलो |
| 22 | गुळाची पावडर | उत्तम प्रतीचा | 25 किलो |
| 23 | बटर | उत्तम प्रतीचा | 50 किलो |
| 24 | बेकींग पेपर | उत्तम प्रतीचा | 500 नग |
| 25 | पेपर कप | उत्तम प्रतीचा | 2000 नग |
| 26 | फ्रुट जाम | उत्तम प्रतीचा | 5 किलो |
| 27 | इलायची पावडर | उत्तम प्रतीचा | 1 किलो |
| 28 | चोको चिप्स | उत्तम प्रतीचा | 50 किलो |

<u>दरपत्रक निवीदा उघडण्याचा तपशिल</u>

**दरपत्रक सादर करण्याचे ठिकाण**:- नागपूर मध्यवर्ती कारागृहाच्या **मुख्यद्वारासमोरील दरपत्रक पेटीत** सिलबंद लिफाफे टाकावेत.

**दरपत्रक सादर करण्याचा दिनांक**:- दि.02/05/2026 सकाळी 9.00 ते दि.10/05/2026 सायंकाळी 17.00 वाजेपर्यत

**दरपत्रक उघडण्याचा दिनांक**:- दि.11/05/2026 सायकांळी 5.00 वाजता.(अधिक्षक, नागपूर मध्यवर्ती कारागृह यांचे दालनात)

(उक्त दिनांकामध्ये प्रशासकीय सोईनुसार बदल होवू शकतो.)

## <u>दरपत्रकाच्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे</u>

१. दुकानाचा नोंदणीकृत परवाना (गुमास्ता लायसन्स) महाराष्ट्र दुकाने व आस्थापना अधिनियम प्रमाणपत्र चालू वर्षाचे नूतनीकरण प्रमाणपत्र (Latest Renewed Bombay Shops & Establishment Act Certificate 1948, Renew As per Act 2018 Amd)

२. मागील सन 2023-2024,सन 2024-2025 व सन 2025-2026 या तीन वर्षाचे Assessment Year) आर्थिक व्यवहाराबाबत स्टेटमेंटची व सनदी लेखापालाची साक्षांकित प्रत. (Annual Turnover of last 03 years prepared by Chartered Accountant).

३. अधिकृत उत्पादक/विक्रेते असल्याबाबतचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

४. दरपत्रकासोबत जोडलेल्या नमून्यामध्ये एकल निविदा/दरपत्रक देण्याबाबत/विक्रेते दरपत्रक धारकांचे हमीपत्र व PAN CARD व Aadhar Card यांची छायांकित प्रत जोडणे आवश्यक आहे.

५. दरपत्रकामध्ये या कार्यालयाचा मागणीपत्राचा संदर्भ क्र. व दिनांक तसेच संस्थेचा GST IN क्रमांक नमूद करणे आवश्यक आहे. तसेच सोबत GST IN प्रमाणपत्र याची छायांकित प्रत जोडणे आवश्यक आहे.

६. मागील तीन वर्षाचे आयकर विवरणपत्राची छायांकित प्रत सादर करणे आवश्यक आहे.

७. सदरचा पुरवठा हा सन २०२६-२०२७ या वित्तीय वर्षाकरिता असेल.

८. दरपत्रकामध्ये कोणतीही खाडाखोड, गिरवागिरव अथवा व्हाईट इंक (व्हाईटनर) चा वापर करता येणार नाही.

९. दरपत्रक कार्यालयीन वेळेत **तांत्रिक निविदा** व **दरपत्रक निवीदा** स्वंतत्र सिलबंद लिफाप्यात नागपूर मध्यवर्ती कारागृहाच्या मुख्यद्वारासमोरील दरपत्रक पेटीत टाकावे. प्रत्येक पाकीटावर **प्रति- <u>मा. अधीक्षक नागपूर मध्यवर्ती कारागृह</u> यांचे नावे तसेच <u>कारखाना विभाग (लोहारकाम विभाग) तांत्रिक निविदा व दरपत्रक</u>** असे स्पष्ट नमूद करावे. <u>तसेच प्रेषक म्हणून आपल्या व्यावसाईक संस्थेचे नाव, पत्ता,मोबाईल क्र.व ई-मेल नमूद करावा.</u>

१०. दरपत्रकातील दर हे वस्तुची किंमत व जी.एस.टी सह देणे अनिवार्य आहे, तसेच व्यावसाईक दरपत्रक विहीत नमून्यात संस्थेच्या लेटरहेडवर प्राधिकृत स्वाक्षरीसह असावेत.

११. कोणत्याही कारणाशिवाय एखादे दरपत्रक किंवा दरपत्रक प्रक्रिया रदद करण्याबाबतचे सर्व अधिकार या कार्यालयाने राखून ठेवले आहेत.

१२. तांत्रिक निविदेचा लिफाफ्यात निवीदाधारक पात्र ठरल्यावरच दरपत्रक निविदा उघडण्यात येतील.त्यामुळे स्वतंत्र पाकीटाच निविदा सादर कराव्यात.

१३. कच्चा माल खरेदी पुरवठा पात्र आदेश पत्र मिळाल्याच्या दिनांकापासून 7 दिवसाच्या आत कारागृह मुख्यदारापर्यत स्वखर्चाने करावा लागेल. दिलेला मुदतीमध्ये कच्चा माल पुरवठा न केल्यास कोणतीही पुर्व सूचना न देता पुरवठा आदेश रदद करण्याचे अधिकार या कार्यालयास राहतील.

१४. या कार्यालयाने दिलेल्या पुरवठा आदेशातील मागणी प्रमाणे पुरवठा करणे बंधनकारक राहील.

१५. कारागृहाद्वारे शासकीय संस्थांना उत्पादनाचा पुरवठा केला जातो. काही अपरिहार्य कारणास्तव शासकीय संस्थाकडून मागणी आदेश रद्द झाल्यास निविदाधारकाद्वारे पुरवठा रद्द करण्याचे अधिकार या कार्यालयास राहतील

१६. पुरवठा केलेला कच्चा माल विनिर्देश, नमुना तसेच माल मानक गुणवत्तेप्रमाणे (Standard Quality) नुसार नसल्यास दोषयुक्त माल स्वखर्चाने परत घेवून जावे लागेल तसेच उक्त मालाचा बदलून पुरवठा करावा लागेल. दोषमुक्त माल तांत्रिक व प्रयोगशाळा तपासणीमध्ये कमी प्रतीचा दोष आढळून आल्यास यापुढील निवीदेमध्ये संबधीत निवीदाधारकास वगळण्यात येईल.

१७. वस्तुंचा पुरवठा उधारीने करावा लागेल शासकीय अनुदान प्राप्त झाल्यानंतरच बिलाची रक्कम अदा करण्यात येईल.उक्त प्रतिक्षा कालावधीसाठी कोणतेही अतिरिक्त मोबदला/ व्याज देय असणार नाही.

१८. दरत्रपकामधील नमूद कच्चा मालाचा पुरवठा अर्धवट झाल्यास अथवा वेळेवर पुरवठा न केल्यास गरजेनूसार कच्चा माल खुल्या बाजारातून खरेदी करण्यात येईल त्यात कारागृहाचा जास्त खर्च झाल्यास अथवा नुकसान झाल्यास त्याची वसूली आपल्या बिलातून करण्यात येईल .

१९. वरिल सर्व अटीं व शर्ती मान्य असल्याचे हमीपत्र सादर न केल्यास आपले दरपत्रक रदद/अपात्र समजण्यात येईल याची नोंद घेण्यात यावी.

२०. वरिल सर्व अटी व शर्ती मान्य असलेबाबत सदर सुचनापत्रावर व्यावसाईक संस्थेच्या शिक्यासह स्वाक्षरी करण्यात यावी व सदर सुचनापत्र दरपत्रकासोबत (तांत्रिक लिफाफ्यामध्ये) जोडण्यात यावे.

२१. तांत्रिक निविदा व दरपत्रक निविदा सादर करताना खालीलप्रमाणे दोन स्वतंत्र लिफाफ्यामध्ये निविदा प्रकार उल्लेख लिहुन सादर करणे आवश्यक आहे.

**अ) तांत्रिक लिफाफा (टेक्नीकल इनव्हलप)-** या लिफाफयामध्ये खालीलप्रमाणे नमुद तांत्रिक कागदपत्राची पुर्तता करणे बधंनकारक राहील.

१) संस्थेचे/दरपत्रकधारकाचे पॅनकार्ड व आधारकार्ड

२) जीएसटी नोदणी प्रमाणपत्र

३) शॉप ॲक्ट १९४८ अंतर्गत वैध नोदणी प्रमाणपत्र (Latest Renewed Bombay Shops & Establishment Act Certificate 1948, Renew As per Act 2018 Amd)

४) विक्रेते/दरपत्रकधारकाचे हमी पत्र (सोबत नमुना जोडला आहे)

५) निविदेतील सर्व अटी व शर्ती मान्य असलेबाबत सदर सूचनापत्र सही व शिक्कासह जोडण्यात यावे.

६) जीएसटी भरणा केल्याचे अद्यायावत चलन

७) मागील तीन वर्षाचे आयकर विवरणपत्राची छायांकित प्रत .

वरील सर्व कागदपत्राच्या छायांकीत प्रती स्वयंसाक्षांकित (self attested) असणे आवश्यक आहे.

**ब) व्यापारी लिफाफा-** या लिफाफ्यात दराबाबतचे विवरण देण्यात यावे. दरपत्रक सादर करतांना सर्व करासहित देणे बंधनकारक असेल.दरपत्रकामध्ये मुळदर व त्यावरील जीएसटी स्वतंत्र दर्शविण्यात यावा.दरपत्रकावर जीएसटी/सीएसटी नमुद असणे आवश्यक राहील. संस्थेच्या लेटर हेडवर दरपत्रक सादर करावे.दरपत्रकावर या कार्यालयाचा दरपत्रक सुचनेचा जावक क्रमाक व दिनांक नमुद करणे आवश्यक आहे.

२२. दरपत्रक उघडण्याचे वेळी दरपत्रक सादर केलेल्या संस्थेचे प्रतिनीधी उपस्थित राहतील.

२३. कारागृह गेट बाहेरील उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कारखाना दरपत्रक पेटीमध्येच दरपत्रक जमा करण्यात यावे. दिलेल्या मुदतीमध्ये प्राप्त न झालेल्या दरपत्रकाचा विचार केला जाणार नाही.

२४. पोस्टाने पाठविलेल्या दरपत्रकांचा विचार केला जाणार नाही. याची नोद घ्यावी.

(वैभव सु.आगे)
अधीक्षक
तथा अध्यक्ष खरेदी समिती
नागपुर मध्यवर्ती कारागृह
नागपुर